ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

International Multilingual Quarterly Peer Review Refereed Resarch Journal
Volume - II - Issue - [illegible] - July to Sept.- 2018



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
Sarkate Sadashiv Haribhau
Email : powerofknowledge3@gmail.com, [illegible]@gmail.com

Scanned with OKEN Scanner

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC

ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

**Volume. II, Issue II**
***July to Sept.- 2018***

Editorial Officer
**Shraddha Enterprises**
Infront of Tahsil Office,
Near Nilkamal Hotel,
Nagar Road,
Beed -431 122
Contact : 9420655507
E-mail : prakashkale.kale@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex.Vice Chancller Y.C.M.U. Nasik
& Professor of Mass Communication
& Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. V. B. Bhise**
Ex-Professor, Dept. of Economics
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Ashok Deshmane**
Head of Dept.Marathi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Asso.Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Appasaheb Humbe**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Ulhas Shinde**
Ex-Dean, Faculty of Engineering
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College,
Mantha. Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science
College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr. Fulchand Salampure**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**REFERECS**

Dr. Shahaji Gaikwad
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

Dr. R. V. Shikhare
Vice -Principal
R.B. Attal College Georai

Dr.Vishwas Patil
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

Dr. Shivaji Yadhav
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

Dr. Ganesh Adgaonkar
Dept. Of Commerce
Kalikadev College. Shirur (Ka.)

Dr. Laxmikant Shinde
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

Mr. Ramesh Ringne
Prof. Bapu Ghokshe
Mr. Shivaji Kakade
Dr. Shakur Shaikh Husain

Mr. Vinod Kirdak
Dr. Datta Tangalwad
Mr. Kalandar Pathan
Dr. Suhas Morale
Dr. Baliram Katare

Assit.Prof.Mohan Kalkute
Dr. Adgaonkar Ganesh
Dr. Santosh Chavan
Dr. Rajkumar Yallawad

Scanned with OKEN Scanner

## अनुक्रमणिका (Index)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | VIOLENCE AGAINST WOMEN & GIRLS | Dr. Mohamad Mustafa A. Mujawar Nadwi | 1 |
| 2 | INDIAN IMAGES IN NISSIM EZEKIEL'S POETRY | Dr.Subhash S. Waghmare | 5 |
| 3 | Dr. Babasaheb Ambedkar Important Suggestion for Reservation for Sheduled Castes and Adivasi Tribes | Prakash Kharat | 8 |
| 4 | MODES OF IRRIGATION IN BEED DISTRICT, A GEOGRAPHICAL STUDY | Mr. Usare Bharat Rupchand, | 11 |
| 5 | Experiment in Engaging men in Gender Equality | Dr. Arundhati Suryakant Patil | 15 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली लोकशाही | प्रा. अरुण पडघन | 18 |
| 7 | मानव संसाधन विकास : सैध्दांतिक विवेचन | फुलारी ज्योती | 22 |
| 8 | बाबासाहेबांचे वाचन : एक वेध | डॉ. लक्ष्मण गीते | 27 |
| 9 | मराठी ग्रामीण कथेतील सहकाराचे चित्रण | प्रा. डॉ. बबन गायकवाड | 30 |
| 10 | दलित साहित्य : एक चिंतन | प्रा.लक्ष्मण गीते | 35 |
| 11 | आपत्ती व्यवस्थापन : आधुनिक काळाची गरज | प्रा. एकनाथ ज्ञानदेव खरात | 37 |
| 12 | महामानव नेल्सन मंडेला यांचे काव्यरूपाने दिसून येणारे चित्रण | डॉ. दादाराव गुंडरे | 42 |
| 13 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही | प्रा.डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव | 46 |
| 14 | ओतारी समाजाचे लोकजीवन | ओतारी विक्रम अभिमन्यू | 48 |
| 15 | बदलत्या हमावानाचा भारतीय कृषीक्षेत्रावर परिणाम | प्रा.डॉ. देशमुख एस.बी. | 50 |
| 16 | नव्वदोत्तर स्त्रीवादी काव्य | प्रा. रेखा व्ही. इंगोल | 53 |
| 17 | 'आदिवासींच्या विकास योजना व दिशा " (20 वे शतक) नाशिक | श्री. जी. डी. रुपवते | 58 |
| 18 | माळव्यातील धार व देवास संस्थानाची प्रशासकीय व्यवस्था | प्रा.डॉ.सुनिल रजपूत | 60 |
| 19 | चारमीनार एक सुंदर आणि आकर्षक इमारत | प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | 64 |
| 20 | आदिवासी लेखकांनी लिहिलेले साहित्य : स्वरुप व विचार | प्रा. डॉ. जगतवाड शिवाजी पिराजी | 66 |
| 21 | अण्णाभाऊ साठे यांचे कादंबरी लेखन : आशय आणि वेगळेपण-काही निरीक्षणे | प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवस | 69 |
| 22 | लीळाचरित्र : एक श्रेष्ठ वाङ्मयीन कलाकृती | डॉ. सौ. जयदेवी पवार | 75 |


Scanned with OKEN Scanner

Power of Knowledge Peer Review Journal, Volume : II, Issue : II, July to Sept. - 2018 ISSN 2320-449

# महामानव नेल्सन मंडेला यांचे काव्यरूपाने दिसून येणारे चित्रण

डॉ. दादाराव गुंडरे
मराठी विभागप्रमुख,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

मानवी जीवनाच्या मुशीतूनच मराठी साहित्याची निर्मिती झालेली आहे. त्यात प्राचीन अशी परंपरा लाभलेल्या कविता या वाङ्मय प्रकाराचा समावेश होतो. कवितेतून निर्मितीकाराचे विचार, जाणीवा, भावना व अनुभव व्यक्त होतात. मानवी कार्यकर्तृत्वाचा इतिहास हा खूप प्राचीन असून तो प्रभावी, चिरंतन, शूरवीरांचा आहे. नानाविध जीवन क्षेत्रात मानवी कार्यकर्तृत्वाचे ठसे उमटलेले दिसून येतात. त्यास मराठी साहित्याचे क्षेत्रही अपवाद ठरत नाही. महामानवांच्या जीवनकार्याच्या थोरवीचा प्रभाव संवेदनशील अशा कवीमनावर पडणे साहजिकच आहे. ज्यातून मानवी कल्याणाचा, जीवनमूल्यांचा विचार प्रकट होताना दिसतो. इतर अनेक महामानवांच्या जीवनाचा वेध अनेक कवी व कवयित्रींनी घेतला आहे. तसाच वेध भारतरत्न नेल्सन मंडेला यांच्या व्यक्तीमत्त्वाचाही घेतलेला दिसून येतो. तोच प्रामुख्याने समोर आणने हा या शोधनिबंधाच्या पाठीमागे हेतू आहे.

ज्याप्रमाणे भारतीय समाजव्यवस्था ही चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारित दिसते त्याप्रमाणे दक्षिण आफ्रिकेतही काळा आणि गोरा असा वर्णद्वेष केला जाई. जात, धर्म, वर्ण, पंथ यावरून माणसाची ओळख ठरवली जाते; तिथे द्वेष, कपटनीती, नीचता, अन्याय, अत्याचारास सामोरे जावे लागते. जसे भारतीय समाजव्यवस्थेत अस्पृश्य म्हणजेच दलित माणूस वर्णवादाचा, जातीयतेचा, विषम व्यवस्थेचा बळी गेलेला वर्ग दिसून येतो. तसे दक्षिण आफ्रिकेतही वर्णभेदाचा बळी गेलेला, वर्णभेदावरून अन्याय, अत्याचारास सामोरा गेलेला एक वर्ग आहे. अशा वर्णभेदातून निर्माण झालेल्या द्वेषस सुरूंग लावण्याचा पहिला प्रयत्न डॉ. नेल्सन मंडेला यांनी केला आहे. त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकताना कवी वामन निंबाळकर म्हणतात,

"नेल्सन मंडेला
त्यांनी तुला
कैदबंद केले तेव्हाच तुझ्या
पारतंत्र्याचे साखळदंड निखळून पडले
खळखळा
बंदीवासाच्या अजस्त्र भिंतीतून
तुझ्या कवितेतून निघालेली
स्वातंत्र्याची किरणे
आरपार जावू लागली
त्याने हजारो गुलाम प्रकाशमान झाले
विनीला योद्धा केले, कप्तान केले."(१)

डॉ. नेल्सन मंडेला म्हणजे धगधगीत-ज्वालाच, एक उसळते मानवमुक्तीचे बंडच. ज्यांच्या रोमारोमात वर्णद्वेषाविरूद्ध



Scanned with OKEN Scanner

असंतोष खदखदत होता. काळ्या वर्णांच्या जनतेस गोऱ्या वर्णांच्या जनतेच्या गुलामगिरीतून बाहेर आणण्यासाठी डॉ. नेल्सन मंडेला यांनी आपल्या कवितेद्वारे बंडखोर विचार मांडून आपल्या समाज बांधवापर्यंत पोहचवले. त्यांच्या कवितेतील शब्दाशब्दातून काळ्या वर्णास नावे ठेवणाऱ्या, त्यांचा द्वेष करण्याऱ्या गोऱ्या कातडीच्या लोकासंबंधी आपले विचार अभिव्यक्त केले होते. त्यामुळे दक्षिण अफ्रिकेत काळा-गोरा असा वर्णसंघर्ष शिगेला पोहचला. जेव्हा गोऱ्या वर्णाच्या वर्णवाद्यांनी, वर्चस्ववाद्यांनी डॉ. नेल्सन मंडेला यांना कैदबंद केले. तेव्हा त्यांनी आपल्या वर्णमुक्तीलढ्याचे नेतृत्त्व आपली प्रिय पत्नी विनी मंडेला यांच्याकडे सोपवले. आपल्या लढयास कैदेत राहूनही वेग देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. म्हणूनच कवी वामन निंबाळकर पुढे म्हणतात,

"तुला कैद करणाऱ्या
गोऱ्या वर्णाचा फाजिल अभिमान
बाळगणाऱ्यांना
हे कळायला हवे होते की,
तुला प्रदीर्घकाळ कैदेत डांबून
जेलच्या भिंती खिळखिळ्या होतील
त्यात पांढरे उंदीर घुशी मरतील
आणि बंदिवासातील
प्रत्येक दिवसाचा क्षण अन क्षण
तुझ्या स्वातंत्र्य युद्धावर
विजयाच्या सुवर्णमुद्रा
अंकित करतील."(२)

जिताजागता, धगधगता लाव्हा म्हणजे डॉ. नेल्सन मंडेला. शेकडो वर्षापासूनची शक्ती एकवटून आलेला समाजाचा मुक्तीदाताच होता. डॉ. मंडेलानी मानवमुक्तीचा लढा हाणून पाडणाऱ्या शक्तीविरूद्ध, मानवी अन्याय उधळून लावण्यासाठी संपूर्ण आयुष्यच खर्ची घातले. दुष्ट, नीच गोऱ्या वर्णाच्या लोकाविरूद्ध लढा देऊन जनतेच्या मनावरती अधिराज्य मिळवले. दक्षिण अफ्रिकेतील प्रतिआंबेडकर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. नेल्सन मंडेला यांच्या कार्याची आचार-विचार व मानवमुक्तीच्या लढ्याची नोंद कवी वामन निंबाळकरांनी घेतली आहे.

कवयित्री हिरा बनसोडे यांनीही डॉ. नेल्सन मंडेला यांच्या महनीय कार्याची नोंद काव्याद्वारे घेतली आहे. त्या म्हणतात,

"पण मंडेला फुले, आंबेडकरासारखाच
तू जिगरबाज निघालास बहादरा
प्राण तळहातावर घेऊन तेही लढले महारथ्यासारखे
तुमच्यासारख्या दैदिप्यमान हिऱ्यांना
अभिमानाने कोरून ठेवावे तर काळजावर
पण ह्या निर्बुद्ध खलपुरूषाचे कुठले हे भाग्य?
सूर्यावर थुंकणाऱ्या या वळवळणाऱ्या किड्यांना



Scanned with OKEN Scanner

टाचेखाली चिरडत महापुरूष तेजाचा मार्ग चालतात."(३)

समाजहितासाठी, देशहितासाठी निःस्वार्थी भावनेने महनिय कार्य करणाऱ्या महापुरूषांना, समाजपुरूषांना बऱ्याच वेळा समाजाने खरा न्याय दिला नाही उलट त्यांच्या कार्यावर अंकुश ठेवून त्यांचे कार्य दडपून टाकण्याचाच धर्मांधतेच्या स्वार्थी सैतानांनी प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतु कोंबडा कोंडून ठेवला म्हणजे पहाट व्हायची थोडीच थांबणार असते. महापुरूषांच्या कार्यास त्याप्रमाणे अधिकच गतिमानता, तेज, धारदारपणा प्राप्त होतो. असे प्राप्त करण्याचा प्रयत्न महात्मा फुले, सॉक्रेटिस, अब्राहम लिंकन, केनेडी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महापुरूषांनी करून मानवमुक्तीचा लढा कार्यरत ठेवला. डॉ. नेल्सना मंडेलांचे कार्यही असेच जिगरबाज, शक्तीशाली होते. गोऱ्यांच्या कैदेतून काळ्या वर्णियांची मुक्तता करणे, त्यांना माणूस म्हणून जगण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. नेल्सन मंडेला यांनी अलौकिक कार्य केले बद्दलचा भाव कवयित्रीने व्यक्त केला आहे. त्यांचा संघर्षमय इतिहास, कार्य सांगून ते गौरवशील बनल्याचे सिद्ध करतात.

नेल्सन मंडेला यांच्याविषयी कृतज्ञता व त्यांनी दिलेल्या लढ्याच्या गौरवाची भावना कवी महेंद्र भवरे यांनी 'चिंताक्रांत मुलूखाचे रूदन' या काव्यसंग्रहातील 'नेल्सन मंडेला' या कवितेतून व्यक्त केली आहे.

जगभराचे महापुरुष मुक्तिदाते मानवमुक्तीसाठी अविरत लढले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वबांधवांच्या मुक्तीसाठी आपले आयुष्य वेचले. त्याचप्रमाणे दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेला यांनी वर्णद्वेषाविरूद्ध लढा उभारून सत्तावीस वर्षे तुरूंगवास भोगला. गोऱ्या लोकांची जुलमी राजवट उखडून टाकून नेल्सन मंडेला यांनी दक्षिण आफ्रिकेत स्वातंत्र्याचे निशाण फडकाविले. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन कवी महेंद्र भवरे लिहितात,

"बंधमुक्तीच्या
काळ्याखाप रानातून आता
वळणं घेतील या काजवी वाटा
शिखरापर्यंत पोहोचतीलही कदाचित
पण गोऱ्या वारूळातील सर्प
करतील दंश कधीही
याचंही भान असावं लागेल."(४)

काळा आणि गोरा अशा वर्णद्वेषाने गुलामगिरीत खितपत पडलेला दक्षिण आफ्रिका नेल्सन मंडेला यांनी मुक्त केला. त्यांचा विद्रोह वादळ बनला, महासागर खवळला. विजांचे असूड फटकारले, गुलामांच्या जखमी अंतःकरणाला त्यां ललकारले आणि गोऱ्यांचे राजसिंहासन उखडले गेले, देश स्वतंत्र झाला, बंधने गळून पडली. प्रत्येक वाटावर, वळणाव प्रकाश दिसेल, काजवे चमकतील पण धोकेही तेवढेच आहेत. गोऱ्या वारूळातील सर्प केव्हा दंश करतील याचा भरव नाही. वर्णभेद, जातिभेद व गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झालेल्यांनी सावध राहण्याचा सल्लाही दिलेला दिसून येतो.

"वंशश्रेष्ठत्वाच्या घनदाट अरण्यातून
रोखलेल्या वळणावरचे
मुर्दाड टेकाडं नसळवून टाकतील
या वाटा उद्दामपणाच्या बेफाम कैफात
तू पेरलास डोळ्यातून अंगार."(५)



Scanned with OKEN Scanner

स्वातंत्र्य, समता व मानवतेसाठी नेल्सन मंडेला यांनी आपले आयुष्य पणाला लावले. मानवी स्वातंत्र्याचे उद्‌गाते, समतेचे पुरस्कर्ते जगभर विखुरलेले आहेत. विषमता दारिद्र्य, अज्ञान, गुलामगिरी हे शाप ज्या ठिकाणी आहेत त्याविरूद्ध आवाज उठविणारे क्रांतीसूर्यही उगवले. नेल्सन मंडेला हे त्यापैकीच एक असल्याचे कवी महेंद्र भवरे सांगतात. महारथ्याप्रमाणे ते एकाकी लढले. तेजाचा मार्ग त्यांनी दाखवला. खलपुरूषांची तमा त्यांनी बाळगली नाही. रंग, रूप किंवा वर्णभेद नेस्तनाबूत करण्यासाठी समर्थपणे लढा दिला. त्यामुळे गोरगारिबांच्या मनात अंगार पेटवण्याचे, शोषकाविरूद्ध लढण्यास बळ देण्याचे, आपली अस्मिता जागृत करण्याचे काम नेल्सना मंडेलांनी केले असल्याचे कवी सांगतात,

"खाकाळून तुटणाऱ्या बेड्याच्या
कड्या कड्यातून मांडलीस
अग्निफुलांची आरास
या वाटेवर
या वाटाचे देतायत आश्वासनं.
नव्या जगाच्या नव्या जगण्याचे."(६)

मानवनिष्ठ समाजरचनेच्या प्रस्थापनेसाठी प्रस्थापितांच्या विरूद्ध लढा देण्याचे काम नेल्सन मंडेलांनी केले असल्याचे कवी सांगतात. आजही एकविसाव्या शतकात जातीयता, धर्मांधता, वर्णद्वेषाची नागीण वळवळताना दिसते. परंतु तिला ठेचण्यासाठी व मानवी मूल्यांचा प्रकाश पसरवण्यासाठी नेल्सन मंडेलांचे जीवनकार्य दीपस्तंभ बनून राहिले आहेत. त्यांच्या जीवनातील अग्निफुलांची रासच बंधमुक्ततेच्या वाटेकडे प्रवृत्त करते. नव्या जगाचे, नव्या जगण्याचे संदर्भ शोधण्याची दृष्टी त्यांच्याकडून मिळते. अशा शब्दातून कवी महेंद्र भवरे नेल्सन मंडेला यांच्या कार्याचा गौरव करतात. जो सामाजिक आशयाच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरतो.

**निष्कर्ष :**

प्रत्येक व्यक्तीमत्त्व भिन्न आहे, याप्रमाणे नेल्सन मंडेला यांचे व्यक्तीमत्त्व घडत गेलेले दिसून येते. ज्या व्यक्तीमत्त्वाची प्रभावी छाप मराठी कवितेवर पडली असून मंडेलांचे जीवनचरित्र काव्याद्वारे समोर आणले. जे काव्य चरित्र मानवी जीवनास दिशादर्शक ठरणारे तसेच मानवाच्या उज्ज्वलतेसाठी, सुखासाठी, मानवतेसाठी खतपाणी पुरवते. जे कोणी धर्म, रूढी, वर्ण यांसारख्या शोषणांच्या गुलामीत अडकले त्यांच्या मुक्तीसाठी संघर्ष करणारी, मानवतेचा उद्‌घोष करणारी ही कविता आहे. त्यामुळे महानायक नेल्सन मंडेला यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारी ही कविता काव्यप्रकाराबरोबर मानवी जीवनास समृद्ध करते असेच म्हणावे लागते.

**संदर्भग्रंथ :**

१ वामन निंबाळकर, 'महायुद्ध', प्रबोधन प्रकाशन, नागपूर ३, प्रथमावृत्ती १ ऑक्टो १९८७, पृष्ठ क्र. ६७.
२ कित्ता, पृष्ठ क्र. ६८.
३ सौ. बनसोडे हिरा, 'फिर्याद', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. द्वितीयावृत्ती जून १९९७, पृष्ठ क्र. ७२.
४ डॉ. दारा गोरे, प्रा. अविनाश डोळस (संपा.), 'काव्यविहार', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथामावृत्ती २६ जून २००३, पृष्ठ क्र. ६४.
५ कित्ता, पृष्ठ क्र. ६५.
६ कित्ता, पृष्ठ क्र. ६५.



Scanned with OKEN Scanner